माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००००९७**

**अपिलार्थी - श्री. जगदंबा प्रसाद पाण्डेय,**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (एसएम-२),**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (एसएम-२),**
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २९.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १५.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.०६.२०२३ | १६.१०.२०२३ | १८.०९.२०२३ | ०६.०१.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.०१.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. ०५.०६.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जा. क्र. प्राशिसं/नखाप्राश/इंशाम/२०१०-२०११ / प्रशा-५१४/४००७ दि. ०६.१२.२०२१ द्वारे मा. शिक्षण संचालक प्राथ. पुणे – १ यांनी आपल्याकडे पत्र पाठवून हिरावती शाममणि शिक्षण संस्था संचालित मदर एच. एस. हायस्कूल, घोलाई नगर, कळवा (पू), जि. ठाणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेची स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावर सन २०१० पासून परवानगी देणेसाठी शिफारशीसह प्रस्ताव सादर केला होता. त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थी यांनी दि. १८.०९.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगासमोर सादर केले की, कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. १६.१०.२०२३ रोजी उत्तर कळविल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.०६.०१.२०२५ रोजी आदेश पारित केले आहे की, उक्त शाळेबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्याकडून दि. ०३.०६.२०२४

..२/-

च्या पत्रान्वये प्राप्त प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून त्याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. ही बाब विचारात घेता, सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची प्रत अपिलार्थी यांना आदेशप्राप्तीच्या ७ दिवसात पुन्हा उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**